लक्ष्मी लॉन्स मंगल कार्यालय
फक्त ५१०००/- रु.
जेवणासह (अटी लागू)
• निसर्गरम्य हवेशिर वातावरण • पाण्याची भरपूर सोय • जेवणासाठी स्वतंत्र हॉल • वधू-वरांना स्वतंत्र रूम्सची सोय • २४ तास लाईटची सोय
श्री स्वामी समर्थ सेवा आश्रम ट्रस्ट
अक्कलकोट-सोलापूर एन.एच.रोड, अक्कलकोट
मो. ९३२६१५८१५१ / ८६२५००५१११

दैनिक सोलापूर
असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक
# कटूसत्य
किंमत ५ रुपये
Email - katusatya@gmail.com
दीपावलीच्या तमाम जनतेस हार्दिक शुभेच्छा !

सोलापूर विमानतळापासून फक्त ५ कि.मी. अंतरावरील १० एकर बागायत शेतजमीन विकणे आहे. १ एकर पॉलिहाऊस, १.५ एकर शेडनेट नर्सरीसाठी उपयुक्त.
संपर्क :- 9850530355
9158821555
(594)

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष १९ वे, अंक ९५ वा | बुधवार, दि. ०६ नोव्हेंबर २०२४ | पाने ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

# कोणता उमेदवार होणार आमदार !

## सोलापूरच्या विधानसभा मतदारसंघातील लढतींकडे संपूर्ण राज्याचे लक्ष

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** राज्यातील विधानसभा निवडणुकांसाठी रणशिंग फुकलं असून दिवाळीच्या फटाक्यानंतरच प्रचारसभांच्या तोफा धडाडू लागल्या आहेत. विधानसभा निवडणुकांसाठी 4 नोव्हेंबरयंत अर्ज माघारी घेण्याची मुदत असल्याने अंतिम लढती आता निश्चित झाल्या आहेत.

पश्चिम महाराष्ट्रातील राजकारणाचं केंद्रस्थान आणि मराठवाड्याचे प्रवेशद्वार असलेला सोलापूर जिल्हा हा साखरेचा जिल्हा म्हणून ओळखला जातो. कारण, सर्वाधिक साखर कारखाने असलेला जिल्हा म्हणून सोलापूर जिल्ह्याची महाराष्ट्राला ओळख आहे. याशिवाय, शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचा बालेकिल्ला म्हणून या जिल्ह्याची ओळख होती. मात्र, भाजपने गत निवडणुकीत जिल्ह्यात वर्चस्व मिळवले आहे. त्यामुळे, यंदाच्या विधानसभा निवडणुकीत काय होणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. सोलापूर जिल्ह्यीताल 11 विधानसभा मतदारसंघातील लढती निश्चित झाल्या असून माढा, बार्शी, सोलापूर दक्षिण, माळशिरस, पंढरपूर आणि सांगोला मतदारसंघात चुरशीच्या लढती होत आहेत.

लोकसभा निवडणुकानंतर येथील जिल्ह्यात अंत्यंत चुरस पाहायला मिळाली. त्यामध्ये, भाजपच्या दोन्ही विद्यमान खासदारांचा पराभव करत महाविकास आघाडीने जिल्ह्यातील माढा आणि सोलापूर या दोन्ही लोकसभा मतदारसंघात विजय मिळवला. त्यामुळे, विधानसभा निवडणुकांमध्येही मोठी रंगत आली आहे. जिल्ह्यातील 11 मतदारसंघातील निश्चित झालेल्या लढती.

**1) शहर मध्य**
भाजप : देवेंद्र कोठे
काँग्रेस : चेतन नरोटे
एमआयएम : फारुक शाब्दी
माकप : नरसय्या आडम
अन्य पक्ष व अपक्ष : प्रा. डॉ. सुभाष गायकवाड (बसपा), खिझार पिरजादे (ऑल इंडिया फॉरवर्ड ब्लॉक), मनिष कोमटी (राष्ट्रीय जनमंच सेक्युलर), योगेश शिदगणे (बहुजन मुक्ती पार्टी), रविकांत बनसोडे (रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (ए)), श्रीनिवास संगेपांग (वंचित बहुजन आघाडी) यांच्याशिवाय तौफिक शेख, दत्तात्रय थोरात, देविदास दुपारगुडे, प्रदिप सर्जन, मनिष गायकवाड, रवि म्हेत्रे, अॅड. रोहित मोरे, विक्रम कसबे, सैपन शेख, डॉ. संदिप आडके.

**2) सांगोला विधानसभा मतदारसंघ**
शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष : दीपक आबा साळुंखे-पाटील
शिवसेना : शहाजी पाटील
शेतकरी कामगार पक्ष : डॉ. बाबासाहेब देशमुख
बहुजन समाज पाटी : शशिकांत गडहिरे
न्यु राष्ट्रीय समाज पार्टी : राघू घुटुकडे
अपक्ष : एकनाथ शेंडगे, परमेश्वर गेजगे, बाळासाहेब देशमुख, बाळासाहेब इंगोले, मोहन राऊत, रणसिंह देशमुख, राजाराम काळेबाग, ज्ञानेश्वर उबाळे



**3) मोहोळ विधानसभा मतदारसंघ**
राष्ट्रवादी काँग्रेस : यशवंत माने
राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष : राजू खरे
अपक्ष : संजय क्षीरसागर
इतर पक्ष व अपक्ष : नागनाथ क्षीरसागर (रासप), नंदु क्षीरसागर (न्यू इंडिया पार्टी), बळीराम मोरे (बसपा), अमोल बंगाळे, अनिल आखाडे, कृष्णा भिसे, मधुकर थोरात

**4) माढा विधानसभा मतदारसंघ**
राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष : अभिजीत धनंजय पाटील
राष्ट्रवादी काँग्रेस : मीनलताई दादासाहेब साठे
बहुजन समाज पार्टी : अभिजीत धनवंत पाटील
वंचित बहुजन आघाडी : राहुल गौतम चव्हाण
अपक्ष व अन्य पक्षांचे उमेदवार : अभिजीत आण्णासाहेब पाटील, अभिजीत तुळशीराम पाटील, अॅड. तुकाराम बळीराम राऊत, मयुर अजिनाथ काळे, महेश बाळू बिस्किटे, रणजित बबनराव शिंदे, रणजित भैय्या शिंदे, राजेश तानाजी खरे, सिताराम विठ्ठल रणदिवे

**5) पंढरपूर मतदारसंघ**
समाधान आवताडे : भाजप
अनिल सावंत : राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष
भगीरथ भालके : काँग्रेस
दिलीप धोत्रे : मनसे
दत्ता वाडेकर : बहुजन समाज पार्टी
इतर पक्ष व अपक्ष : अशोक रंगनाथ माने (वंचित), पंकज हरिश्चंद्र देवकते (रासप), राजेंद्र बापू बेदरे (महाराष्ट्र लोकहितवादी पार्टी), सुदर्शन रायचंद खंदारे (अखिल भारतीय सेना), अब्दुलरोफ मुलाणी, आण्णा सुखदेव मस्के, आशफान अब्दुल सय्यद, अमोल सुरेश गायकवाड, तुळजाराम भिमराव बंदपट्टे, दर्शना श्रीगणेश माने देशमुख, निशिकांत बंडू पाटील, विराप्पा मधुकर मोटे, युसुफ राजमहमंद मुजावर, अॅड. बापू दादा मेटकरी, संजय हणमंत वाघमारे, विठ्ठल भिमराव भोरकडे, श्रीकांत श्रीमंत नलावडे, सिध्दराम सोमण्णा काकणकी, ज्ञानेश्वर अरुण पचवाघ.

**6) अक्कलकोट**
सचिन पंचप्पा कल्याणशेट्टी : भारतीय जनता पक्ष
सिध्दाराम सातलिंगप्पा म्हेत्रे : काँग्रेस
मल्लिनाथ शरणप्पा पाटील : महाराष्ट्र नवनिर्माण सेना
इकरार अहमद हसनसाहेब शेख : बहुजन समाज पार्टी
संतोषकुमार खंडू इंगळे : वंचित बहुजन आघाडी
इतर पक्ष व अपक्ष : जमीर याकूबसाब शेख (प्रहार जनशक्ती पार्टी), सुनील शिवाजी बंडगर (राष्ट्रीय समाज पक्ष), अपक्ष - पूजा राहुल पाटील, प्रसाद बसवराज बाबानगरे, शिवलिंगप्पा गुरसिद्धप्पा वंगे, सिध्दाराम नारायण कोळी, ज्ञानोबा जनार्दन साळुंखे.

**7) करमाळा विधानसभा मतदारसंघ**
दिग्विजय दिगंबरराव बागल : शिवसेना
नारायण (आबा) गोविंदराव पाटील : राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष
संजय वामन शिंदे : बहुजन समाज पार्टी
शिदे संजयमामा विठ्ठलराव : अपक्ष
रामदास मधुकर झोळ : अपक्ष
अन्य उमेदवार : अशोक ज्ञानदेव वाघमोडे (न्यु राष्ट्रीय समाज पक्ष) अवचर आभेमन्यू किसन, इतर अपक्ष उमेदवार अॅड. जमीर कलंदर शेख, जालिंदर वाल्मिक कांबळे, धीरज माणक कोळेकर, भानवसे गणेश अभिमान, मधुकर गणपत मिसाळ, वाघमारे सिध्दांत सदाशिव रामदास मधुकर झोळ, विनोद दिलीप सितापुरे, रामदास मधुकर झोळ, शिदे संजय लिबराज, रामदास मधुकर झोळ.

**8) माळशिरस मतदारसंघ**
राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष : उत्तमराव जानकर
भारतीय जनता पक्ष : राम सातपुते
बहुजन समाज पार्टी : सूरज अशोक सरतापे
वंचित बहुजन आघाडी : राज यशवंत कुमार
राष्ट्रीय समाज पक्ष : प्रा. डॉ. सुनील सुखदेव लोखंडे
इतर उमेदवार : अरुण मनोहर धाईजे, कुमार आनंदा लोंढे, दादा विश्वनाथ लोखंडे, मनोज कुमार उत्तम सुरवसे, रमेश अंकुश नामदास, सुधीर अर्जुन पोळ, त्रिभुवन विनायक धाईजे.

(पान 2 वर..)

## दक्षिण सोलापूर विधानसभेचे अधिकृत उमेदवार महादेव कोगनुरे यांच्या प्रचार कार्यालयाचे थाटात उद्घाटन

**दक्षिण सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र नवनिर्माण सेना २५१, सोलापूर दक्षिण विधानसभा मतदारसंघाचे अधिकृत उमेदवार महादेव कोगनुरे यांचा प्रचार कार्यालयाचे उद्घाटन मंगळवार दिनांक 5 नोव्हेंबर 2024 रोजी सकाळी 11 वाजता उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

सोलापूर नेहरूनगर बस स्टॉप च्या पाठीमागे गाळा नंबर २३/१ सुंदर मल्टीपर्पज हॉल विजापूर रोड सोलापूर येथे संपर्क कार्यालय सुरु करण्यात आले आहे.या उद्घाटन समारंभ प्रसंगी जिल्हाध्यक्ष विनायक महिंद्रकर,



प्रशांत इंगळे लोकसभा अध्यक्ष, जैनुद्दीन शेख शहर अध्यक्ष, रोहित कलशेट्टी जिल्हा सचिव, सत्तार सय्यद जिल्हा उपाध्यक्ष, निलेश भंडारे जिल्हा उपाध्यक्ष, आकाश निंबाळकर शहर उपाध्यक्ष, विशाल गुजले शहर उपाध्यक्ष,पवन देसाई शहर उपाध्यक्ष, यश महिंद्रकर शहर उपाध्यक्ष, दिनेश हंचाटे शहर उपाध्यक्ष, राहुल अक्कलवाडे शहर उपाध्यक्ष, प्रदीप बंडे शहर उपाध्यक्ष, अनिल भिसे शहर उपाध्यक्ष, सुरेखा गोब्बुर , किआरा बीके तसेच महाराष्ट्र नवनिर्माण सेना व एम के फाउंडेशन चे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी मनसेचे जिल्हाध्यक्ष विनायक महिंद्रकर, जैनुद्दीन शेख, निलेश भंडारे आदींनी मनोगत व्यक्त करीत मनसैनिकांचा आत्मविश्वास वाढविण्याचा प्रयत्न केला.

## शहर उत्तर' मध्ये शोभा बनशेट्टी यांच्या बंडखोरीने भाजपचा सुपडासाफ होणार..?





**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** शहर उत्तर विधानसभा मतदारसंघातून माजी महापौर शोभा बनशेट्टी यांनी आपली उमेदवारी कायम ठेवली आहे. त्यामुळे भाजपाचे विद्यमान आमदार आणि माजी मंत्री जयकुमार देशमुख यांच्या विजयाचा मार्ग खडतर बनला असल्याने भाजपचा सुपडासाफ होणार..? अशी चर्चा शहर उत्तर विधानसभा मतदारसंघात जोरात सुरु आहे. अर्ज माघार घेण्याच्या शेवटच्या दिवशी अर्थात ४ नोव्हेंबर रोजी या मतदार संघातून २६ पैकी ६ उमेदवारांनी आपापले अर्ज माघार घेतले आहे. त्यामुळे २० उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. (पान 2 वर..)

**शिंदे गटाला २५ नगरसेवक;**

बनशेट्टींचे ठाम आणि श्रेष्ठींचा नाईलाज शहर उत्तर विधानसभा मतदारसंघातून मताची विभागणी टाळण्यासाठी भारतीय जनता पार्टीकडून शर्थीचे प्रयत्न करण्यात आले. आगामी महापालिका निवडणुकीत शिवसेना शिंदे गटाला किमान २५ जागा देण्यासंदर्भा 'भाजपा'कडून आश्वासन मिळाले आहे. त्यामुळे शिंदे यांनी माघार घेतल्याची चर्चा आहे. तर दुसरीकडे माजी महापौर शोभा बनशेट्टी यांना माघार घेण्यास्तव कसोशीने प्रयत्न करण्यात आले. मात्र आपण रिंगणात राहणारच असे ठाम मत त्यांनी व्यक्त केल्याने 'भाजपा' श्रेष्ठींचा नाईलाज झाल्याची चर्चा रंगली आहे.

**२६ पैकी ६ उमेदवारांची माघार**

शिवसेना एकनाथ शिंदे गटाचे जिल्हा प्रमुख अमाले शिंदे यांनी स्वराज्य पक्षाकडून या मतदार संघातून उमेदवारी अर्ज दाखल केले होते. मात्र त्यांनी ऐनवेळी आपला अर्ज माघार घेतले. तसेच 'काँग्रेस'चे सुनील रसाळे, प्रकाश वाले, हिंदू महासभेचे संजय साळुंखे आणि अपक्ष अमरनाथ बिराजदार यांनीही माघार घेतली. या मतदार संघातून एकूण २६ जणांनी उमेदवारी अर्ज भरले होते. त्यापैकी ६ जणांनी माघार घेतल्याने २० उमेदवार रिंगणात आहेत.

## राज्यातील शाळांसाठी नवीन वैद्यकीय आपत्कालीन मार्गदर्शक तत्त्वे जारी

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** शालेय वयात असणारी मुले त्यांच्या दिवसातील ६- ७ तास शाळांमध्ये घालवतात हे लक्षात घेऊन, या काळात उद्भवू शकणाऱ्या आपत्कालीन वैद्यकीय परिस्थितीसाठी शाळांना सक्षम करण्यासाठी ही मार्गदर्शक तत्त्वे जारी केली जातात.

मार्गदर्शक तत्त्वांनुसार, शाळांनी वेळेत प्रथमोपचाराची तयारी केल्यास कोणतीही अनुचित घटना टाळता येईल.

प्रथमोपचार प्रशिक्षण कार्यशाळेसह सहज उपलब्ध होणारे प्रथमोपचार किट, उपचार करण्याकरिता विशेष रुमची व्यवस्था आणि वार्षिक वैद्यकीय तपासणी यासारख्या काही मूलभूत बाबी समाविष्ट आहेत.

महाराष्ट्राच्या शालेय शिक्षण विभागाने या संदर्भात जारी



केलेल्या सरकारी निर्णय (ऋ्फ) मध्ये नमूद केले आहे की, 'वैद्यकीय आणीबाणीशी संबंधित सर्व मार्गदर्शक तत्त्वे पाळली जातात याची खात्री करण्यासाठी एक प्रशिक्षक असावा,' असे नमूद केले आहे.

ऑन-कॉल डॉक्टर सुविधेची उपलब्धता सुनिश्चित करण्यासाठी शाळांनी जवळच्या रुग्णालयांशी सामंजस्य करार केले पाहिजेत असे नमूद केले आहे. मार्गदर्शक तत्त्वांमध्ये असेही सांगितले आहे की, कोणत्याही मुलाला तातडीने रुग्णालयात नेण्याची गरज भासल्यास शाळेत वाहनाची सुविधा असावी.

मुंबई उच्च न्यायालयाच्या जुलै २०२४ पासूनच्या निर्देशांचे परिणाम आहेत, जेव्हा त्यांनी महाराष्ट्र सरकारला आवश्यक वैद्यकीय सुविधा आणि आणीबाणीच्या परिस्थितीत अवलंबल्या जाणाऱ्या प्रक्रियांबाबत सर्वसमावेशक सूचना जारी करण्याचे निर्देश दिले होते.

फेब्रुवारी, २०१६ मध्ये कांदिवलीतील एका महाविद्यालयातील विद्यार्थिनीचा वर्गात चक्कर येऊन बाकावर डोके आपटल्याने मृत्यू झाला होता. तिला व्हीलचेअरवरून सहाव्या मजल्यावरून खाली आणून जवळच्या रुग्णालयात नेण्यात आले होते, तेथे रक्तस्त्रावामुळे तिचा मृत्यू झाला होता. त्या मुलीच्या आईने केलेल्या याचिकेवर न्यायालयाने निकाल दिला होता.

## मतदार संघात विकासाची परंपरा कायम राखण्यासाठी महायुतीच्या कार्यकर्त्यांनी एकदिलाने काम करावे - माजी आमदार राजन पाटील

### वडवळ येथे महायुतीचे उमेदवार यशवंत माने यांच्या प्रचाराचा उत्साहात शुभारंभ

**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** मोहोळ विधानसभा मतदार संघाच्या विकासात्मक पालकत्वाची जबाबदारी ज्या विश्वासाने सर्वसामान्य जनतेने आमच्या हाती दिली त्याच अढळ विश्वासाच्या पाठबळावर या मोहोळ विधानसभा मतदार संघाचा विकासात्मक कायापालट आम्ही करु शकलो. त्यामुळे विकासाची ही भक्कम परंपरा अविरतपणे सुरु ठेवण्यासाठी या विधानसभा निवडणुकीतही महायुतीचे अधिकृत उमेदवार यशवंत माने यांना सलग दुसऱ्यांदा मोठ्या मताधिक्याने विजयी करण्यासाठी कार्यकर्त्यांनी सज्ज व्हावे असे आवाहन मोहोळचे माजी आमदार तथा मोहोळ विधानसभा मतदार संघाचे सर्वेसर्वा



यावेळी केवळ मोहोळ तालुक्याचे नव्हे तर संपूर्ण जिल्ह्यातील लाखो भाविकांचे श्रध्दास्थान असलेल्या सिध्दनागेशांचे आशिर्वाद माजी आमदार राजन पाटील, उमेदवार यशवंत माने यांनी घेऊन श्रीफळ फोडून प्रचाराचा शुभारंभ करण्यात आला. लोकनेते शुगरचे चेअरमन बाळराजे पाटील, सिनेट सदस्य अजिंक्यराणा पाटील यांच्या शिस्तबध्द संयोजनातून या प्रचार शुभारंभ कार्यक्रमाचे अतिशय नेटके आणि सुरेख नियोजन झाले. याठिकाणी उपस्थित असलेली मोठी गर्दी तसेच महायुतीचे प्रत्येक पक्षातील पदाधिकायांच्या उपस्थितीमुळे विकासात सरस असलेला अनगरकर पॅटर्न प्रचारातही सरस ठरणार असल्याचे स्पष्टपणे जाणवत आहे.

माजी आमदार राजन पाटील यांनी वडवळ येथे केले.

राष्ट्रवादी महायुतीचे अधिकृत उमेदवार यशवंत माने यांच्या प्रचाराचा शुभारंभ वडवळ येथे सिध्दनागेश मंदिरात आशिर्वाद घेऊन करण्यात आला त्यानंतर आयोजित शुभारंभ सभेत मार्गदर्शन करताना माजी आमदार बोलत होते. यावेळी उमेदवार तथा विद्यमान आमदार यशवंत माने, लोकनेते शुगरचे चेअरमन बाळराजे पाटील, सिनेट सदस्य अजिंक्यराणा पाटील, भिमाचे माजी व्हा. चेअरमन कल्याणराव (बप्पा) पाटील, तालुकाध्यक्ष प्रकाश चवरे, शिवसेनेचे सहसंपर्क प्रमुख दादासाहेब पवार, भाजपचे संजीव (दादा) खिलारे, ओ.बी.सी. नेते अविनाश मातंर्डे, शिवसेनेच्या महिला आघाडी प्रमुख मुक्ता खंदारे, राष्ट्रवादी महिला जिल्हाध्यक्षा वषार्राणी शिंदे, राष्ट्रवादी युवक तालुकाध्यक्ष राहुल (भैय्या) मोरे, राजुबापू गावडे, पांडुरंग ताटे इत्यादींसह पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी बोलताना राजन पाटील पुढे म्हणाले की, विरोधकांना केवळ टिका करणे तसेच व्यक्तीद्वेष करणे इतकच जमतं. ज्या मतदार संघातील रस्त्यावरुन ते प्रचाराच्या गाड्या घेऊन फिरणार आहेत ते रस्ते आमच्या सत्ता कालावधीत विकास निधीतूनच पूर्ण झाले आहेत. २७०० कोटी रुपयांपेक्षा जास्तीचा निधी खेचून आणत अजितदादा पवार यांच्या नेतृत्वाखाली यशवंत माने यांनी मतदार (पान 2 वर..)

## जिल्ह्याच्या अकरा विधानसभा मतदारसंघात निवडणूक प्रक्रिया यशस्वीपणे पार पाडावी - निवडणूक जनरल निरीक्षक

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** भारत निवडणूक आयोगाने दिनांक 15 ऑक्टोबर 2024 रोजी महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणूक 2024 चा कार्यक्रम जाहीर केलेला आहे त्यानुसार दिनांक 20 नोव्हेंबर 2024 रोजी जिल्ह्याच्या अकरा विधानसभा मतदारसंघात मतदानाची प्रक्रिया पार पडणार असून दिनांक 23 नोव्हेंबर 2024 रोजी मतमोजणी होणार आहे. तरी या निवडणुकीच्या अनुषंगाने नियुक्त केलेले सर्व



अधिकारी कर्मचाऱ्यांनी त्यांच्यावर सोपवण्यात आलेली जबाबदारी अत्यंत काटेकोरपणे पार पाडून ही निवडणूक प्रक्रिया यशस्वी करावी, असे आवाहन अकरा विधानसभा मतदारसंघासाठी नियुक्त करण्यात आलेले निवडणूक जनरल निरीक्षक अफसाना परवीन, निधी निवेदिता, सादिक आलम, रितुराज रघुवंशी, सुबोध कुमार यांनी संयुक्तपणे केले.

जिल्हा नियोजन समितीच्या सभागृहात आयोजित विधानसभा निवडणूक 2024 च्या आढावा बैठकीत ते मार्गदर्शन करत होते. यावेळी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, पोलीस शहर आयुक्त एम. राजकुमार, पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, निवासी उपजिल्हाधिकारी मनीषा कुंभार, पोलीस शहर उपायुक्त दिपाली काळे, अतिरिक्त पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर, उपजिल्हा निवडणूक (पान 2 वर..)

## माकप च्या मध्यवर्ती कार्यालयाचे मोठ्या उत्साहात उदघाटन

### पैशाला नाही प्रमाणिकपणाला मत द्या - अशोक इंदापूरे

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर शहराचा चेहरा मोहरा बदलण्याची धमक असणारे आडम मास्तर आज पुन्हा एकदा निवडणुकीच्या रिंगणात उभे राहिले आहेत. महाराष्ट्र विधानसभेत जाणकार अभ्यासू , अनुभवी आमदार म्हणून ते काम पाहिलेले आहेत. ते अहोरात्र समाजातल्या प्रत्येक माणसासाठी झगडणारा आणि जगणारा आपला माणूस आहे. तेव्हा या विधानसभा निवडणुकीत धर्मांध भाजप पक्षाचे उमेदवार देवेंद्र



कोठे, काँग्रेस चे चेतन नरोटे, आणि एम.आय.एम चे फारूक शाब्दी या मतदार संघात पैशाचा पाऊस पाडतील त्या खोट्या आश्वासना बळी न पडता प्रमाणिकपणाला मत द्या. असे आवाहन अशोक इंदापूरे यांनी केले.

मंगळवार दिनांक 5 नोव्हेंबर रोजी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे अधिकृत उमेदवार माजी आमदार कॉ. नरसय्या आडम मास्तर यांच्या निवडणूक प्रचार मध्यवर्ती कार्यालयाचे उद्घाटन वाहतूक संघटनेचे नेते रियाज सय्यद यांच्या अध्यक्षतेखाली कामगार संघटना संयुक्त कृती समितीचे राज्याचे नेते अशोक इंदापूरे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी कॉ.नरसय्या आडम मास्तर हे सभेला संबोधित करताना म्हणाले की, मी तमाम सोलापूर जनतेच्या हितासासाठी आणि सर्वांगीण विकासासाठी उभा आहे. ज्यांच्यावर (पान 2 वर..)

## संपादकीय

# पुढच्या वर्षी जनगणना?

जनगणना आयुक्त मृत्युंजयकुमार नारायण यावर्षीच्या अखेरीस निवृत्त होणार होते. पण सरकारने त्यांना ऑगस्ट 2026 पर्यंत म्हणजे तब्बल दीड वर्षाची मुदतवाढ दिली आहे. तेव्हापासून भारतात पुढच्या वर्षी जनगणना होईल, असा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. आपल्या देशात आता होणारी जनगणना दोन कारणांसाठी फार महत्त्वाची ठरणार आहे. एक म्हणजे त्याआधारे लोकसभा आणि विधानसभांत महिला आरक्षण लागू करण्यात येईल. सप्टेंबर 2023 मध्ये संसदेच्या खास अधिवेशनात मोदी सरकारने महिला आरक्षण विधेयक संमत करून घेतले. यासाठी सरकारने 106वी घटनादुरुस्ती केली होती.

मात्र त्याच्या अंमलबजावणीसाठी जनगणनेचा नवा अहवाल हवा आहे जो पुढच्या वर्षी होत असलेल्या जनगणनेनंतर उपलब्ध होईल. याचा अर्थ असा की 2029 मध्ये होर्णाअया लोकसभेच्या निवडणुकांत महिला आरक्षण लागू होईल. दुसरे कारण म्हणजे जनगणना अहवाल आला की मतदारसंघांच्या सीमांची पुनर्रचना करता येईल. या दोन कारणांसाठी भारतीय जनता जनगणना अहवालाची वाट पाहात आहे.

आपल्या देशात ब्रिटिशांनी 1871 मध्ये दर दहा वर्षांनी जनगणना करण्याची पद्धत रूढ केली. त्यानुसार दर दहा वर्षांनी जनगणना सुरू झाली. ब्रिटिशांची सत्ता होती तेव्हा 1931 मध्ये झालेली जनगणना शेवटची. त्यानंतर 1941 मध्ये दुसरे महायुद्ध सुरू असल्यामुळे जनगणना होऊ शकली नाही. नंतर 1947 मध्ये स्वातंत्र्य मिळाले आणि 1951 मध्ये प्रजासत्ताक भारतात पहिली जनगणना संपन्न झाली. जर पुढच्या वर्षी अपेक्षेप्रमाणे जनगणना झाली तर जनगणनेचे नवे चक्र अस्तित्वात येईल.

आतापर्यंत 1951, 1961, 1971 वगैरे अशी झालेली जनगणना यापुढे 2025 नंतर 2035 आणि 2045 वगैरे असेल. पुढच्या वर्षी जर जनगणना झाली तर मग मतदारसंघ सीमारेषा पुनर्रचना आयोग गठीत केला जाईल आणि 2028 पर्यंत मतदारसंघांच्या सीमांकनाची प्रक्रिया पूर्ण होण्याची शक्यता आहे. मग 2029 च्या लोकसभा निवडणुका होतील.

सध्या याबद्दल जरी जोरदार चर्चा सुरू असली तरी अद्याप केंद्र सरकारने याबद्दल घोषणा केलेली नाही. आजपर्यंत घेतलेल्या जनगणनेत 'धर्म' आणि 'वर्ग' याबद्दल माहिती विचारली जात होती. शिवाय अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींची गणना केली जाते. आता मात्र पुढच्या वर्षीच्या जनगणनेत लोकांना ते कोणत्या पंथाचे अनुयायी आहेत वगैरेसुद्धा विचारले जाऊ शकते.

आता ही माहिती महत्त्वाची ठरण्याची शक्यता आहे. कारण कर्नाटक राज्यात लिंगायत समाज 'ओपन कॅटगरी'त येतो. पण लिंगायत स्वतःला वेगळा पंथ मानतात. याच्या बरोबरीनेच अनुसूचित जातींमधील 'वाल्मिकी' 'रविदासी' वगैरे विविध पंथांची दखल घ्यावी लागेल. हे फार गुंतागुंतीचे आहे.

या संदर्भात खर्चाचा विचार करणेसुद्धा गरजेचे आहे. 'राष्ट्रीय लोकसंख्या नोंदणी' नुसार या कामासाठी सुमारे 12 हजार कोटी रुपयांचा निधी लागेल. आगामी जनगणना ही देशातील पहिली डिजिटल जनगणना ठरण्याची शक्यता आहे. यासाठी जनगणना प्राधिकरणाने 'स्वयंगणना पोर्टल' तयार केल्याची जरी बातमी आली तरी अद्याप हे पोर्टल सुरू झालेले नाही. मात्र, यासाठी आधारकार्डचा क्रमांक किंवा नोंद झालेला मोबाइल क्रमांक असणे गरजेचे आहे.

जगभर आज देशातील लोकसंख्येचा विचार आणि अभ्यास करावा लागतो. मुंबईतल्या चेंबूर भागात 'इंटरनॅशनल इन्स्टिट्युट ऑफ पॉप्युलेशन सायन्स' ही संस्था हे कार्य करत आहे. भारतातील जवळपास सर्व प्रसुतिकागृह या संस्थेशी संगणकाद्वारे जोडलेली आहेत. मूल जन्माला आले की या संस्थेला समजते. बाळाची लिंग वगैरे माहिती मिळते. ही प्रक्रिया 24 तास सुरू असते. म्हणून ही संस्था दर अर्ध्या तासाने भारताची लोकसंख्या किती, हे जाहीर करते. यासाठी एकेकाळी या संस्थेच्या गेटवर एक मोठा डिजिटल बोर्ड लावलेला असायचा. या माहितीच्या जोडीला भारतातील लोकसंख्येचा वाढीचा दर, मृत्यूदर, किती लोकसंख्या कोणत्या वयोगटात, कोणत्या आर्थिक गटात आहे वगैरेसुद्धा अद्ययावत माहिती उपलब्ध असते.

गेले काही वर्षे, खासकरून 1990 मध्ये मंडल आयोग लागू झाल्यापासून अनेक ओबीसी नेते जातनिहाय जनगणना झाली पाहिजे, अशी मागणी करत आहेत. भाजपाचे केंद्र सरकार याला अनुकूल नाही असे दिसल्यावर मुख्यमंत्री नितीशकुमार यांनी बिहार राज्यात अशी जातनिहाय जनगणना तडीस नेली. सुरुवातीला भारतीय जनता पक्ष जातनिहाय जनगणनेला अनुकूल होता. आता मात्र विरोध करत आहे. आगामी जनगणनेच्या संदर्भात हाच कळीचा मुद्दा ठरत आहे. एक भाजपा सोडला तर आज देशातल्या अनेक प्रमुख राष्ट्रीय आणि प्रादेशिक राजकीय पक्षांचा जातनिहाय जनगणनेला पाठिंबा आहे. भारतात 1931 सालापर्यंत जातनिहाय जनगणना होत असे.

प्रजासत्ताक भारतात हे बंद करण्यात आले. हा धोरणात्मक निर्णय होता. आपल्याला जातीव्यवस्था नष्ट करायची होती. असे प्रत्यक्षात झालेंतर नाहीच उलटपक्षी आज जातिव्यवस्था अधिकाधिक घट्ट झाल्याचे दिसत आहे. जातनिहाय जनगणनेची मागणीने एकविसाव्या शतकात जोर धरला. सरतेशेवटी डॉ. मनमोहन सिंग सरकारने 2011 साली सामाजिक आणि आर्थिक जनगणना करण्याचे ठरवले आणि त्यानुसार केलीसुद्धा. मात्र गोळा केलेल्या माहितीत असंख्य त्रुटी राहिल्या ही सबब पुढे करत हा अहवाल जनतेसमोर ठेवलाच नाही.

नंतर जातनिहाय जनगणनेत पक्षीय राजकारण शिरले. काँग्रेस आणि इंडिया आघाडीतील घटकपक्षांचा या मागणीला पाठिंबा आहे तर भाजपाचा विरोध आहे. मात्र, भाजपाप्रणीत राष्ट्रीय लोकशाही आघाडीतील नितीशकुमार यांचा संयुक्त जनता दल तसेच जनशक्ती पार्टी, अपना दल वगैरे प्रादेशिक पक्षांनी या मागणीला पाठिंबा दिला आहे. आता तर राष्ट्रीय स्वयंसेवक संघानेसुद्धा पाठिंबा दिला आहे. मोदी सरकारला बदललेल्या जनमताचा अंदाज आहे. ही मागणी टाळल्यास क्षोभ निर्माण होऊ शकतो याचा मोदी सरकारला अंदाज आहे. आज ना उद्या सत्तारूढ पक्ष यातून मार्ग काढेल असा अंदाज आहेच.

# शहरे गुदमरली; श्वास कोंडला

सर्वोच्च न्यायालयाने आदेश देऊनही दिवाळीच्या दिवसात रात्री उशिरापर्यंत सुरू असलेल्या फटाकेबाजीमुळे देशातील प्रमुख शहरांत रात्रीच्या वेळेत हवा प्रदूषणात प्रचंड वाढ झाल्याचे समोर आले आहे. शुक्रवार, शनिवार आणि रविवार या तिन्ही दिवशी दिल्लीसह देशातील प्रमुख शहरांच्या हवेचा निर्देशांक वाईट स्तरावर होता त्यामुळे आधीच प्रदूषित असलेली शहरांची हवा आणखी प्रदूषित झाली. वास्तविक फटाकेमुक्त, पर्यावरणपूरक दिवाळी साजरी करा असे आव्हान अनेक सामाजिक आणि सेवाभावी संस्थांनी केले होते. शालेय शिक्षण विभागाने तर शालेय विद्यार्थ्यांना फटाके उडवणार नाही अशी शपथ दिली होती. न्यायालयाने फटाके उडविण्यास परवानगी दिली मात्र वेळेचे बंधन घातले या सगळ्या आव्हानांकडे नागरिकांनी दुर्लक्ष करत मनसोक्त फटाकेबाजी केली. वास्तविक फटाक्यांचे दुष्परिणाम सर्वांना माहीत आहे तरीही दरवर्षीप्रमाणे यावर्षीही सरकारच्या आणि सेवाभावी संस्थांच्या आव्हानाला हरताळ फासत सर्वत्र फटाक्यांचा बेसुमार धूर काढण्यात आला त्याचा व्हायचा तो परिणाम झालाच. फटाक्यांमुळे अनेक शहरांची हवा प्रदूषित झाली विशेषतः दिल्ली, मुंबई, नवी मुंबई, ठाणे, पुणे यासारख्या मोठ्या शहरातील हवेचे प्रदूषण चिंता वाटावी इतक्या गंभीर पातळीवर जाऊ लागले. जी शहरे कमी प्रदूषित शहर म्हणून गणली जात होती त्या शहरातही हवेचे प्रदूषण कमालीचे वाढल्याचे एका अहवालातून समोर आले आहे. मुंबई, पुण्याच्या तुलनेत ग्रामीण भागात कमी प्रदूषण असते मात्र यावेळी ग्रामीण भागातही प्रदूषण कमालीचे वाढले. ग्रामीण भागात पहिल्यांदाच इतके प्रदूषण दिसून आले. याला फटाकेच जबाबदार आहेत. दिवाळीत बेसुमार फटाकेबाजी करण्यात आली त्यामुळे चांगली हवा असलेले शहर अशी ओळख असलेल्या शहरांचीही प्रदूषित शहरात गणना झाली आहे अर्थात मुंबई, नवी मुंबई हेच शहरे नाही तर पुणे, नागपूर, औरंगाबाद यासारख्या शहरातही फटाक्यांच्या आतषबाजीने प्रदूषण वाढले आहे. केवळ राज्यातीलच नाही तर देशातीलही अनेक शहरात फटाक्यांमुळे प्रदूषण वाढले आहे. देशातीलच नव्हे तर जगातील सर्वाधिक प्रदूषित शहर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या दिल्ली शहरातील हवा या वर्षीही अती प्रदूषित श्रेणीत गणली गेली आहे. आपल्या राज्यासह देशात उत्सवाच्या नावाखाली लोकांनी मनमानी करत बेसुमार फटाक्यांची आतषबाजी केली त्यामुळेच दरवर्षीपेक्षा यावर्षी अधिक प्रमाणात फटाके उडवण्यात आले त्याच्याच परिणाम म्हणजे राज्यातील अनेक शहरे अतिप्रदुषित किंवा प्रदूषित श्रेणीत गणली गेली. सर्वोच्च न्यायालयाने ही यावर नाराजी व्यक्त करत दिल्ली व केंद्र सरकारला फटकारले आहे. अर्थात हवा प्रदूषित होण्यास केवळ फटाके हेच एकमेव कारण आहे असे नाही तर वाढती वाहने हे ही एक महत्वाचे कारण यामागे आहे मात्र दिवाळीत प्रदूषणाची पातळी खूप वाढते हे सत्य कोणीही नाकारू शकणार नाही आता हेच पहाणा गुरुवारी संध्याकाळी पुण्या – मुंबईच्या हवेची पातळी समाधानकारक या श्रेणीत होती ती अवघ्या चोवीस तासात वाईट या श्रेणीत पोहचली याचाच अर्थ बेसुमार फटाकेबाजीने हवा प्रदूषित झाली. हवा प्रदूषित झाल्याने शहरांचा जीव गुदमरला आणि नागरिकांचा श्वास कोंडला. दिवाळी नंतर अस्थमाच्या रुग्णांत मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याचे पाहायला मिळाले. या दूषित हवेचा सर्वाधिक फटका लहानमुले, गरोदर महिला, वृद्ध नागरिक व व्याधीग्रस्त रुग्णांना बसला शिवाय फटाक्यांमुळे अनेक ठिकाणी दुर्घटना घडल्याच्या बातम्याही आपण टीव्हीवर पाहिल्या. अनेक मुले फटाक्यांमुळे जखमी झाले तर काही ठिकाणी फटाक्यांमुळे आग लागून दुर्घटना घडल्या त्यात मोठ्या प्रमाणात वित्तहानी झाली. हे सर्व टाळायचे असेल तर किमान पुढील वर्षापासून तरी फटाकेमुक्त दिवाळी साजरी करायला हवी. सरकारनेही फटाक्यांवर बंदी आणायला हवी आणि हो ही बंदी केवळ दिवाळी पुरतीच नको तर कायमस्वरूपी हवी कारण दिवाळी व्यतिरिक्त इतरवेळीही फटाके वाजवले जातात. दिवाळीत त्याचे प्रमाण अधिक असते इतकेच कदाचीत त्यामुळेच दिवाळीत फटाक्यांचे दुष्परिणाम तीव्रतेने दिसून येतात.



**श्याम ठाणेदार**
दौंड जिल्हा पुणे

## प्रबोधन

# उद्योगाच्या घरी

कुबेर तुझा भांडारी। आम्हा फिरविशी दारोदारी। यात पुरुषार्थ मुरारी। काय तुजला पै आला? व्यंकटेशस्तोत्र म्हणणारे असा दोष रोज स्नानानंतर ईश्वराला देत असतात. कुबेर हा म्हणे देवांचा खजिनदार. लक्ष्मी ही म्हणे धनाची देवी. ती रोज तळहातातून खणखणीत नाणी देवांच्या खजिन्यात टाकत असते. पण स्वर्गात देवांना सर्व काही फुकटच मिळत असल्याने कुबेराचा खजिना रिकामा कधी होतच नसावा. बरं स्वर्गात घातपात, अपघात, आग किंवा पूर इत्यादी संकटं नसल्याने भरपाई देण्याचा प्रश्न नाही. त्यामुळे या पैशांचं काय करायचं, असं कुबेराला वाटत असेल. लक्ष्मी, कुबेर हे सारे मुक्काम पोस्ट स्वर्ग असल्याने त्यांचे बँकिंग व्यवहार स्वर्गापुरते लिमिटेड असतात.

तरीही धनलोभी माणसांनी पुराण- पोथ्यांतून लक्ष्मीचा शोध घेऊन तिची मंदिरं अनेक ठिकाणी बांधली आहेत. आपणाला लक्ष्मीच्या बँचेस मिळतील आणि आपण मालामाल होऊ असं त्यांना वाटलं असावं. पण मंदिरं बांधण्यात आणि लक्ष्मीपूजेत काही लोक गुंतलेले पाहून बाकीच्यांनी त्यांचा जमीनजुमला, सोनंनाणं पळवलं आणि ते स्वतःला लक्ष्मीपुत्र म्हणवू लागले. लक्ष्मीचे पुजारी मात्र भिक्षुक – भिकारीच राहिले. लक्ष्मीचा पती व्यंकटेश. काहींनी त्याच्याकडून तिच्याकडे स्तोत्र रोज म्हणून काही जमतं का ते पाहिलं. पण काही उपयोग झाला नाही. थोडक्यात, लक्ष्मीने जगाला एकही बँच दिली नाही, ती नाहीच. स्वगर्व धन स्वर्गात आणि जगाचं दारिद्य जगात राहिलं.

बऱ्याच वर्षांपूर्वी टाकाच्या फेकी नावाचं पुस्तक चित्र आणि कल्पनाकार शंकरराव किर्लोस्कर आणि भाष्यकार ना. सी. फडके यांनी तयार केलं होतं. त्यात उद्योगी माणसाला लक्ष्मी माळ घालते असं एक चित्र व बोध होता. शंकरराव किर्लोस्कर हे पुरोगामी विचारवंत होते. लक्ष्मीची पूजा मंदिरात जाऊन करायची नसते, तर जे क्षेत्र आपण निवडलं, तेथे श्रम करूनच तिला प्रसन्न करावं लागतं, असा त्यांचा उपदेश होता. पण किर्लोस्कर हे बुवा- महाराज – अवतारी – सद्गुरू नसल्याने त्यांचं मार्गदर्शन वाचणाऱ्यांनीही आचरणात आणलं नाही. परिणामी, आज श्रमाची पूजा सोडून लक्ष्मीचे दरिद्री उपासकांची मोठ्ठी पैदास तयार झाली. ह्या वांझोट्या भक्तीला पश्चात्तापाचं फळच येणार.

पूर्वीची एक फारच सुंदर उपदेशपर कविता आठवते. दारिद्य मरण यातून मरण बरे, बा दरिद्रता खोटी । मरणात दुःख थोडे, दारिद्यात व्यथा असे मोठी। अशा त्या ओळी होत्या. मृत्यू बरा, दारिद्य नको हे बऱ्याचजणांना पटतं, तरीही सद्गुरू-आध्यात्मिकांचे उपदेश ऐकून आपले कामधंदे सोडून सत्यनारायण, गुरुवारचे लक्ष्मीव्रत, सोळा सोमवार, नवरात्र बसणे, महालक्ष्मी किंवा बालाजीचे अभिषेक, संकष्ट्या अशा मार्गाने अचानक धनलाभाची भाविकबुद्धीने प्रतीक्षा करणारे मोठ्या प्रमाणात दिसतात. लक्ष्मीची पूजा न करणारे गडगंज श्रीमंत जगभर प्रवास करीत चैन करताहेत. त्यांची संपत्ती त्यांच्या पिढ्यान-पिढ्यांच्या परिश्रमातून आणि वाचकांची पसंती उद्योगातून वाढत चालली आहे. त्याची ही पावती इकडे भट-ज्योतिषी व बुवा-सद्गुरूंच्या नादाला लागलेले मात्र देव-देवी दर्शनासाठी उन्हातान्हात रखडत; गाठीला असलेले चार पैसे गब्बर पुजाऱ्याची धन करीत आहेत. ह्या जुगारी मनोवृत्तीतून आपले बहुसंख्य लोक कधीच सुटणार नाहीत, अशीच चिन्हं दिसतात. एकूण देशस्थिती उदासीन आहे ती त्यामुळेच. संत तुकडोजी लिहितात-

श्रीमंता आपुले न वाटे काम।
गरिबा उत्पादनाचे नाही प्रेम।
शिक्षिता हीन वाटती परिश्रम ।
यानेच आली अवकळा ।।

म्हणूनच भजन-पूजनात गुंतू नका.
उद्योगी व्हा! कारण-

थोडे धनवंत । बाकीचे कंगाल
जगाचे हे हाल। पूवार्पार ॥ १
शहाणे, चलाख । धूर्त होती धनी
बिचारे अडाणी । कंगाल ते ॥ २
कृपा कुबेराची । अथवा लक्ष्मीची
गोष्ट थापाड्यांची । मूर्खासाठी ॥ ३
शारीरिक श्रम । खूप केल्यावर
पैसा थोडाफार । प्राप्त होतो ॥४
बुद्धीने मिळती । पैसे थोडे जास्त
जगावया फक्त । मिळे त्याने ॥ ५
कष्टाची गरज । श्रीमंता नसते
आयते मिळते । व्याज त्यांना ॥ ६
देव, दैव, कृपा। सारे काही झूठ
श्रीमंतांचा थाट । बारामास ॥ ७
गरिबाने केली । भक्ती किती जरी
मिळेना भाकरी । अर्धी त्यास ॥ ८
द्रव्य प्राप्त करा। कष्टाने, बुद्धीने
लक्ष्मीच्या भक्तीने । लाभ नाही ।। ९



**प्रा. डॉ. जे. बी. शिंदे**
844/1, साळोखेनगर,
कळंबा रोड, कोल्हापूर-416012
92258 09071

पान १ वरून

## कोणता उमेदवार होणार आमदार!...

**9) शहर उत्तर विधानसभा मतदारसंघ**
विजयकुमार देशमुख : भारतीय जनता पक्ष
महेश कोठे : राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष
परशुराम इंगळे : मनसे
इतर पक्ष व अपक्ष उमेदवार : शीलवंत काळे (बहुजन समाज पार्टी), अमित गायकवाड (रिपब्लिकन सेना), जुबेर पटेल भारतीय काँग्रेस पक्ष, दत्ता थोरात (ब्लु इंडिया पार्टी), युवराज लिंबोळे (राईट टू रिकॉल पार्टी), विक्रांत गायकवाड (वंचित बहुजन आघाडी), अपक्ष – शोभा बनशेट्टी, अजित मुत्तुर, दत्तात्रय पांढरे, मल्हारी पाटोळे, मारुती सावंत, गुरुशांत मोकाशी, मोसीन मैंदर्गीकर, राजू शिंदे, विष्णू खंदारे, संतोष कोटे, विजयकुमार उघडे

**10) सोलापूर दक्षिण**
सुभाष देशमुख : भारतीय जनता पक्ष
अमर पाटील : शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष
धर्मराज काडादी : अपक्ष
महादेव कोगनुरे : मनसे
संतोष पवार : वंचित
बाबा मिस्त्री : प्रहार संघटना
उर्वरित उमेदवार : सोमेश वैद्य, तौफिक शेख, कपिलदेव कोळी, उमेश काळे, सिद्राम कांबळे, चंद्रकांत व्हनकडे, संकेत बंगाळे, मौलावी सय्यद, सचिन सोनटक्के, अशोक ढोणे, अप्पाराव कोरे, परशुराम डोंबाळे, बसवराज बगले, बाळासाहेब पाटील, मनिष गायकवाड, मनोहर नरोटे, मोहसीन शेख, युवराज राठोड, रजाक मुजावर.

**11) बार्शी विधानसभा मतदारसंघ**
दिलीप सोपल : शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे
राजेंद्र राऊत : शिवसेना
मनोज कांबळे : बसपा
इतर पक्ष व अपक्ष उमेदवार : आनंद यादव (महाराष्ट्र राज्य समिती), किशोर गाडेकर (राष्ट्रीय समाज पक्ष), धनंजय जगदाळे (वंचित बहुजन आघाडी), अपक्ष पुढीलप्रमाणे – अब्बास शेख, आकाश दळवी, इस्माईल पटेल, ॲड. किरण मांजरे, किशोर देशमुख, साहेबराव देशमुख, मधुकर काळे, मोहसीन पठाण, मोहसीन तांबोळी, लालू सौदागर, वर्षा कांबळे, विनोद जाधव, शफिक शेख, समीर सय्यद.

## शहर उत्तर' मध्ये शोभा बनशेट्टी यांच्या...

गेली ३ टर्म विजयकुमार देशमुख यांनी या मतदारसंघावर वर्चस्व प्रस्थापित केले आहे. विजयकुमार देशमुख यांच्या विरोधात २० उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात माजी महापौर महेश कोठे यांनी यापुवीर्ही निवडणूक लढविली होती. मात्र त्यांना पराभव स्वीकारावा लागला होता. यंदा महेश कोठे यांनी 'महाविकास आघाडी'कडून राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या वतीने तगडे आव्हान उभे केले आहे. त्यातच 'भाजपा'च्याच माजी महापौर शोभा बनशेट्टी यांनी विजयकुमार देशमुख महेश कोठे शोभा बनशेट्टी यांच्या विरोधात बंड पुकारले आहे.

या मतदारसंघात २० उमेदवार निवडणूक रिंगणात असले तरी 'भाजपा'चे विजयकुमार देशमुख, 'राष्ट्रवादी'चे महेश कोठे आणि 'अपक्ष' शोभा बनशेट्टी असा तिरंगी सामना रंगणार आहे. माजी आमदार सिद्रामप्पा पाटील यांच्या कन्या तथा माजी महापौर शोभा बनशेट्टी यांनी खरंच मनावर घेवून ही निवडणूक लढविली तर विजयकुमार देशमुख यांना फटका बसण्याची शक्यता नाकारता येत नाही, असे राजकीय वतुर्ळातून बोलले जात आहे.

## जिल्ह्याच्या अकरा विधानसभा मतदारसंघात...

अधिकारी गणेश निऱ्हाळी, उपजिल्हाधिकारी महसूल अमृत नाटेकर, स्वीप चे नोडल अधिकारी सुधीर ठोंबरे, सिव्हिलचे नोडल अधिकारी आशिष लोकरे, वाहतूक व्यवस्था नोडल अधिकारी गजानन नेरपगार, लिकर चे नोडल अधिकारी भाग्यश्री जाधव यांच्यासह अन्य नोडल अधिकारी, सर्व विधानसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी उपस्थित होते.

निवडणूक जनरल निरीक्षक श्री सुबोध कुमार म्हणाले की, निवडणूक यशस्वीपणे पार पाडण्यासाठी अधिकारी कर्मचारी यांचे प्रशिक्षण व्यवस्थित होणे हा महत्त्वाचा घटक आहे. त्याप्रमाणे सर्व निवडणूक निर्णय अधिकारी यांनी त्यांच्याकडे नियुक्त केलेल्या अधिकारी कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण व त्यांना प्रात्यक्षिक चांगल्या पद्धतीने करून घेतले पाहिजेत. मतदानाच्या दिवशी मतदानाची प्रक्रिया वेळेत पार पाडण्यासाठी कोणत्याही प्रकारची अडचण उद्भवणार नाही याची खात्री सर्व संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी यांनी करून घ्यावी असेही त्यांनी सूचित केले.

जिल्ह्यात स्वीप अंतर्गत सुरू असलेल्या कामकाजाची माहिती जनरल निवडणूक निरीक्षक यांनी घेऊन हा कार्यक्रम अत्यंत काटेकोरपणे राबवून जास्तीत जास्त मतदाराचे प्रबोधन करून मतदानाची टक्केवारी वाढण्यासाठी प्रयत्न करावेत अशा सूचना केल्या. यावेळी सर्व जनरल निवडणूक निरीक्षक यांनी निवडणूक कामकाजाची माहिती घेऊन सर्व संबंधितांना मार्गदर्शक सूचना दिल्या.

प्रारंभी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी सोलापूर जिल्हा प्रशासनाने विधानसभा निवडणूक 2024 च्या अनुषंगाने जिल्ह्यातील अकरा विधानसभा मतदारसंघात केलेल्या निवडणूक तयारीची सविस्तर माहिती बैठकीत दिली. तसेच सोलापूर शहर पोलीस आयुक्त श्री. राजकुमार व पोलीस अधीक्षक श्री. कुलकर्णी यांनी सोलापूर शहर व सोलापूर ग्रामीण मध्ये पोलीस विभागाच्या वतीने निवडणूक कामकाजासाठी नियुक्त करण्यात आलेले मनुष्यबळ तसेच कायदा व सुव्यवस्था ठेवण्यासाठी करण्यात येत असलेल्या उपाययोजनांची माहिती दिली.

**सी व्हिजील व जिल्हा नियंत्रण कक्षास भेट :-**

विधानसभा निवडणुकीसाठी सोलापूर जिल्ह्यात नियुक्त केलेले सर्व निवडणूक जनरल निरीक्षक यांनी जिल्हा नियोजन भवन मध्ये विधानसभा निवडणूक 2024 च्या अनुषंगाने नागरिकांच्या तक्रारीचा निपटारा करण्यासाठी तयार करण्यात आलेल्या कक्ष तसेच संपूर्ण निवडणूक प्रक्रियेवर लक्ष ठेवण्यासाठी तयार करण्यात आलेल्या नियंत्रण कक्षास भेट देऊन पाहणी केली.

## माकप च्या मध्यवर्ती कार्यालयाचे...

आपण विश्वास ठेवून लोकसभेत पाठवले ते आपल्याशी विश्वासघात केले याचा बदला घेण्यासाठी 20 नोव्हेंबर रोजी मला प्रचंड मताधिक्याने विजयी करा असे आवाहन केले. यावेळी पक्षाचे नेते युसुफ मेजर, इरफान सर आदींनी आपले मनोगत व्यक्त केले.

यावेळी व्यासपीठावर कामनी आडम, नलिनी कलबुर्गी, नसीमा शेख,शेवंता देशमुख,सुनंदा बल्ला, व्यंकटेश कोंगारी, दिनेश घोडके, अकील शेख,नरसिंह म्हेत्रे,अशोक तांबोलु, विश्वनाथ म्हेत्रे, देवीदास कुमार, हाफिज अबूबकर, रमेश चक्राल, अनिल लिंबोले, अजीज पटेल, नरसय्या कंदुल, म.हनीफ सातखेड, अब्राहम कुमार, शंकर म्हेत्रे, आदींची उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा सचिव ॲड एम एच शेख यांनी केले. सूत्रसंचालन ॲड.अनिल वासम यांनी तर आभार बापू साबळे यांनी केले.

## मतदार संघात विकासाची परंपरा कायम राखण्यासाठी...

संघातील प्रत्येक सर्वसामान्यांची मने जिंकली आहेत. त्यामुळे या शिवनरा निवडणुकीतही हेच मन जिंकलेले मतदार यशवंत माने यांनाही विजयी करुन विरोधकांना त्यांची जागा दाखवून देतील.

यावेळी बोलताना उमेदवार यशवंत माने म्हणाले की, मतदार संघातील रस्ते, पाणी या मुलभुत सोयी सुविधांसाठी शासन स्तरावरुन निधी आणू शकल्याचे मनाला कृतार्थ समाधान आहे. मतदार संघाच्या कानाकोपऱ्यातील प्रत्येक गावात विकासाची गंगोत्री पोहचवली आहे. माजी आमदार राजन पाटील यांनी दिलेली संधी ही विकास सेवेची संधी मानत काम केल्यामुळे मोहोळ मतदारसंघ विकासाच्या बाबतीत जिल्ह्यात अव्वल ठरु शकला आहे. केवळ मतदार संघाचा नाही तर मोहोळ शहराचाही गेल्या अनेक वर्षापासूनचा पिण्याच्या आणि शेतीच्या पाण्याचा प्रश्न सोडवू शकलो. टिका करण्याऱ्या विरोधकांच्या टिकेला उत्तर देण्यापेक्षा सामान्याचे प्रश्न सोडवण्याला मी प्राधान्य देत आलो आहे. यापुढेही हीच विकाससेवा निरंतर चालू राहील असेही माने म्हणाले.

यावेळी कल्याणराव पाटील, सुनिल भोसले, पांडूरंग ताटे यांनीही आपआपल्या मनोगतातून राजन पाटील यांच्या नेतृत्वाचे आणि यशवंत माने यांच्या विकास कार्याचे आवर्जून कौतुक केले.

## वात्रटिका

### तेच ते जथ्थे

आज दिसले इथे तेच
कालही होते तिथे...
सगळ्यांच्या सोबत तेच
ते आहेत जथ्थे...
जोर लावून आवेशात
त्यांचा जयजयकार असतो...
हार झाली की लगेच पलटी
आणि मग धिक्कार असतो...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
8698067566

# विधानसभा निवडणूक कालावधीमध्ये मुद्रित , इलेक्ट्रॉनिक व समाज माध्यमावरील प्रचारावर बारकाईने लक्ष ठेवावे - निवडणूक जनरल निरीक्षक

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** विधानसभा सार्वत्रिक निवडणुक कार्यक्रम २०२४ अंतर्गत जिल्ह्यातील सर्व मुद्रित , इलेक्ट्रॉनिक व समाज माध्यमावर जिल्हास्तरीय माध्यम प्रमाणीकरण आणि सनियंत्रण समिती (एम.सी.एम.सी.) ने अत्यंत बारकाईने लक्ष ठेवावे व उमेदवारांचा माध्यमातील सर्व निवडणूक खर्च त्यांच्या खर्च नोंदवहीत नोंदवला जाईल यासाठी दक्षता घ्यावी, असे निर्देश अकरा विधानसभा मतदारसंघासाठी नियुक्त सर्व निवडणूक जनरल निरीक्षक यांनी दिले.

विधानसभा सार्वत्रिक निवडणुक कार्यक्रम २०२४ अंतर्गत जिल्हा माहिती कार्यालय येथे जिल्हास्तरीय माध्यम प्रमाणीकरण आणि सनियंत्रण समिती (एमसीएमसी) कार्यान्वित करण्यात आली आहे.सदर समिती मुद्रित व इलेक्ट्रॉनिक माध्यमातून प्रसारित होणाऱ्या पेड न्यूजसह तसेच सोशल मीडियाच्या वापरावरही करडी नजर ठेवण्याचे कार्य करीत आहे.त्यामुळे आज निवडणूक जनरल निरीक्षक अफसाना परवीन, निधी निवेदिता, सादिक आलम, ऋतुराज रघुवंशी, सुबोध कुमार, एमसीएमसी समितीचे अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद व उपजिल्हा निवडणूक अधिकारी गणेश नि-हाळी यांनी जिल्हा माध्यम कक्षला भेट देऊन कामकाजाची पाहणी केली आणि मार्गदर्शन केले. यावेळी जिल्हा माहिती अधिकारी तथा समितीचे सदस्य सचिव सुनिल सोनटक्के, समिती सदस्य तथा क्षेत्रीय प्रचार अधिकारी अंकुश चव्हाण, सदस्य डॉ श्रीराम राऊत, अंबादास यादव, रफिक शेख, गणेश बिराजदार, सचिन सोनवणे आणि समीर मुलाणी आदी उपस्थित होते.

जिल्ह्यात सध्या ११ विधानसभा मतदारसंघामध्ये सुरू असलेल्या निवडणूक काळात माध्यम प्रमाणीकरण व माध्यम सनियंत्रण समितीची भूमिका ही अतिशय जबाबदारीची आहे.तसेच आज सर्व उमेदवारांकडून समाज माध्यमाद्वारे केल्या जाणाऱ्या प्रचारावरही या समितीने काळजीपूर्वक लक्ष ठेवणे गरजेचे आहे.विविध वृत्तपत्रात येणाऱ्या संशयीत पेड न्यूज शोधून संबंधित उमेदवाराच्या निवडणूक खर्चात तो खर्च समाविष्ठ करावा.भारत निवडणूक आयोगाने दिलेल्या निदेर्शाप्रमाणे अत्यंत काटेकोरपणे समितीने कामकाज करावे.समितीने दैनंदिन पेड न्यूजचा अहवाल खर्च समितीला नियमितपणे सादर करावा आणि समितीचे कामकाज अतिशय जबाबदारीने पार पाडावे अशी सुचना केली.

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स (0217)2605091 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone-0217-2605091 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# संतोष पवार यांच्या प्रचाराचा झाला शुभारंभ, पहिल्याच सभेत विरोधकांवर सोडले टीकास्त्र



**दक्षिण सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** २५१ दक्षिण सोलापूर विधानसभा मतदार संघातील वंचित बहुजन आघाडी पक्षाचे अधिकृत उमेदवार संतोष पवार यांच्या प्रचाराचा नारळ मंगळवारी फोडण्यात आला. हत्तूर येथील ग्रामदैवत तीर्थक्षेत्र श्री गुरु सोमेश्वर श्री गुरु बनसिध्देश्वर यांच्या चरणी नतमस्तक होऊन पवार यांनी आपल्या प्रचाराला सुरुवात केली आहे.

दक्षिण विधानसभा मतदारसंघात आता बहुरंगी लढत होत आहे त्यामध्ये वंचितच्या संतोष पवार यांनी आव्हान दिले आहे.

उमेदवार संतोष पवार यांनी वंचित बहुजन आघाडी पक्ष सर्वधर्मीय लोकांना घेवून यावेळी दक्षिण सोलापूर विधानसभा मतदार संघात सर्व ताकतीने निवडणूक लढविणार आहे. कारखानदार यांच्या विरोधात दंड थोपटले असून तालुक्याच्या उज्वल भविष्याचा विचार करून जनता सजग होऊन, प्रस्थापित नेते आणि घराणेशाही विरोधात ठाम भूमिका घेत परिवर्तन घडवून आणेल, जनता जनार्दन यांच्या आशीवार्दाने मी आमदार होऊन सर्वसामान्य शेतकरी, कष्टकरी, कामगार, बेरोजगार यांचे प्रश्न सोडवणार आहे.

यावेळी आतिश बनसोडे, सायरा शेख, सोमलिंग कणपडियर, बिळेंनी कनपडियर, बंडप्पा पाटील, राजू गडदे, काकासाहेब माने, रवींद्र इंगळे, भरमन्ना गावडे, प्रकाश पवार, लक्ष्मण राठोड, वंचित बहुजन आघाडीचे माजी जिल्हाध्यक्ष विजयकुमार गायकवाड, शहराध्यक्ष प्रशांत गुडेवार, सोलापूर दक्षिण तालुका अध्यक्ष सुरेश देशमुख, सह सचिव शिवाजी मंजरेकर, जिल्हासंघटक उत्तम दिलपाक, विक्रम गायकवाड, असिफ यत्नाळ, संतोष राठोड, अजय चव्हाण, अमोल कांबळे, किरण पवार, रोहित पवार आदी उपस्थित होते.

# लोकसभेच्या निकालानंतर महायुती घाबरली - आ. रोहित पवार

## नारायण पाटील यांच्या प्रचारार्थ जाहीर सभा



**करमाळा (कटूसत्य वृत्त):-** राज्यात भाजप सत्तेत आल्यापासून महाराष्ट्राची घसरण तर गुजरातची प्रगती झाली आहे. आता महाराष्ट्र धर्म टिकविण्यासाठी भाजपविरुद्ध लढाई सुरू आहे. जनता महाविकास आघाडीसोबत असून विधानसभेला १७० ते १८० आमदार महाविकास आघाडीचे निवडून येतील. लोकसभेच्या निकालानंतर महायुतीवाले घावरले आहेत. असे विधान कर्जत- जामखेडचे आमदार रोहित पवार यांनी केले आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे करमाळा विधानसभेचे उमेदवार नारायण पाटील यांच्या प्रचारार्थ येथील महात्मा गांधी विद्यालयाच्या आवारात आयोजित करण्यात आलेल्या जाहीर सभेत आमदार पवार हे बोलत होते.

यावेळी माढ्याचे खासदार धैर्यशील मोहिते-पाटील, माजी आमदार जयवंतराव जगताप, उमेदवार माजी आमदार नारायण पाटील, बारामती अ‍ॅग्रोचे उपाध्यक्ष सुभाष गुळवे, नगराध्यक्ष वैभवराजे जगताप, माजी जिल्हा परिषद सदस्या सविताराजे भोसले, खरेदी- विक्री संघाचे तालुकाध्यक्ष शंभूराजे जगताप, बाजार समितीचे माजी संचालक देवानंद बागल, माजी सभापती अतुल पाटील, जयप्रकाश बिले, जेऊरचे सरपंच पृथ्वीराज पाटील, बहुजन संघर्ष सेनेचे जिल्हाध्यक्ष राजाभाऊ कदम, राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष संतोष वारे, हनुमंत मांढरे, शिवसेना ठाकरे पक्षाचे तालुकाध्यक्ष सुधाकर लावंड, प्रवीण कटारिया, उस्मान तांबोळी, महिला आघाडीच्या नलिनी जाधव उपस्थित होते.

# सचिन कल्याणशेट्टी व आनंद तानवडे यांच्यात दिलजमाई

**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):-** विधानसभा निवडणुकीदरम्यान अनेक राजकीय घडामोडी पहायला मिळत आहेत एकमेकांचे कट्टर विरोधक ही एकत्र येत आहेत. एकाच पक्षात असून दुखावलेली म्हणे जुळत आहेत. अक्कलकोट विधानसभा मतदारसंघात भाजपसाठी एक चांगली बातमी समोर आली आहे. विद्यमान आमदार तथा



अक्कलकोट भाजपचे उमेदवार सचिन कल्याणशेट्टी आणि भाजपचे माजी जिल्हा परिषद पक्षनेते आनंद तानवडे यांच्यात दिलजमाई झाली आहे. अक्कलकोट विधानसभा निवडणुकीत आमदार सचिन कल्याणशेट्टी विरुद्ध काँग्रेसचे माजी मंत्री सिद्धाराम म्हेत्रे यांच्यात दुरंगी लढत होत आहे. 2019 च्या विधानसभा निवडणुकीत सचिन कल्याणशेट्टी यांच्या सोबत राहिलेले माजी आमदार सिद्रामप्पा पाटील यांनी सिद्धाराम म्हेत्रे यांना पाठिंबा दिला आहे त्यामुळे हा भाजपला मोठा धक्का मानला जातो.

परंतु दुसरीकडे एकाच पक्षातील तानवडे कल्याणशेट्टी या दोन नेत्यांमध्ये असलेले तात्विक मतभेद विसरून हे दोन्ही नेते आता एकत्र येत आहेत. यासाठी उस्मानाबाद जिल्हा मध्यवर्ती बँकेचे चेअरमन बापूराव पाटील आणि सिध्देश्वर कल्याणशेट्टी यांनी पुढाकार घेतला. या तिघांमध्ये बैठक झाली. आज मंगळवार आमदार सचिन कल्याणशेट्टी यांचा वाढदिवस असून त्या दिवसापासून तानवडे हे त्यांच्या प्रचारार्थ सक्रिय होणार असल्याची माहिती स्वतः त्यांनी दिली. याप्रकरणी आपले नेते आमदार विजयकुमार देशमुख यांच्यासोबत सुद्धा बोलणे झाले आहे असे तानवडे यांनी सांगितले. तानवडे सोबत आल्याने कल्याणशेट्टी यांना निश्चितच फायदा होईल यात शंका नाही.

# सहकार महर्षि शंकरराव मोहिते-पाटील सहकारी साखर कारखान्यामध्ये डिस्टीलरी व ॲसेटीक ॲसिड प्रकल्प उत्पादनाचा शुभारंभ



**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** शंकरनगर-अकलूज येथील सहकार महर्षि शंकरराव मोहिते-पाटील सहकारी साखर कारखान्यामध्ये सन २०२४-२५ चा डिस्टीलरी व ॲसेटीक ॲसिड प्रकल्प उत्पादनाचा शुभारंभ आज करण्यात आला. कारखान्याचे मार्गदर्शक संचालक व महाराष्ट्र राज्याचे माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह शंकरराव मोहिते-पाटील यांचे प्रमुख उपस्थितीत व चेअरमन जयसिंह शंकरराव मोहिते-पाटील यांचे शुभहस्ते संपन्न झाला.

सदर डिस्टीलरी व ॲसेटीक ॲसिड प्रकल्प उत्पादनाचा शुभारंभा निमित्त आज सकाळी श्री सत्यनारायण महापूजा कारखान्याचे संचालक संग्रामसिंह अजितसिंह जहागिरदार व त्यांच्या सुविद्य पत्नी सौ.याज्ञसेनादेवी संग्रमासिंह जहागिरदार या उभयतांचे शुभहस्ते संपन्न झाली.

या प्रसंगी कारखान्याचे व्हाईस चेअरमन शंकरराव माने-देशमुख, संचालिका कु. स्वरूपाराणी मोहिते-पाटील, संचालक लक्ष्मण शिंदे, नानासाहेब मुंडफणे,रामचंद्र सिद,विराज निंबाळकर, रावसाहेब पराडे,डॉ.सुभाष कटके,रामचंद्र ठवरे,तज्ञ संचालक प्रकाशराव पाटील, रामचंद्रराव सावंत-पाटील, संचालिका सुजाता शिंदे, शिवसृष्टी किल्ला व शिवछत्रपती मल्टिमेडीया लेजर शो कमिटी संचालक पांडूरंग एकतपुरे, बाळासाहेब माने-देशमुख,सौ. हषार्ली निंबाळकर तसेच कार्यकारी संचालक राजेंद्र चौगुले व खातेप्रमुख तसेच कामगार उपस्थित होते.

# पंढरपूर मतदारसंघातील उमेदवारांची खर्च लेखा तपासणी 8, 12 व 16 नोव्हेंबर रोजी

## उमेदवार किंवा त्यांच्या प्रतिनिधींनी उपस्थित राहण्याचे आवाहन

**पंढरपूर, (कटूसत्य वृत्त):-** भारत निवडणूक आयोगाच्या निदेर्शानुसार विधानसभा निवडणूक - 2024 च्या अनुषंगाने 252 पंढरपूर विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढविणा-या सर्व उमेदवारांची निवडणूक खर्च लेखा तपासणी 8, 12 व 16 नोव्हेंबर 2024 रोजी करण्यात येणार आहे. सदर खर्च तपासणी वेळी उमेदवार किंवा त्यांच्या प्रतिनिधींनी उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

लोकप्रतिनिधीत्व अधिनियम 1951 मधील कलम 77 मधील तरतुदीनुसार निवडणूक लढविणा-या उमेदवारांनी त्यांच्या निवडणूक खचार्चे अभिलेखे उपलब्ध करून देणे अपरिहार्य आहे. त्यानुसार प्रथम खर्च लेखा तपासणी शुक्रवार दि. 8 नोव्हेंबर 2024 रोजी सकाळी 10 ते सायं 5 वाजेपर्यंत, द्वितीय खर्च लेखा तपासणी मंगळवार, दि. 12 नोव्हेंबर 2024 रोजी सकाळी 10 ते सायं. 5 वाजेपर्यंत तर तृतीय खर्च लेखा तपासणी शनिवार दि. 16 नोव्हेंबर 2024 रोजी सकाळी 10 ते सायं. 5 वाजेपर्यंत शेतकी भवन, पंचायत समिती, पंढरपूर येथे करण्यात येईल.

252-पंढरपूर विधानसभा मतदारसंघाचे निवडणूक खर्च निरीक्षक के.पी. जेयकर हे वरील दिनांकास व वेळेस शेतकी भवन, पंचायत समिती, पंढरपूर येथे खर्च तपासणीकरीता उपलब्ध राहणार आहे. जे उमेदवार खर्चाचे लेखे तपासणीकरीता सादर करणार नाही, त्यांच्यावर निवडणूक आयोगामार्फत योग्य ती कार्यवाही करण्यात येईल, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी, असे 252 पंढरपूर विधानसभा निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी सचिन इथापे यांनी कळविले आहे.

# मोठ्या जाहीर सभांसाठी १०, तर कॉर्नर सभांसाठी १४ मैदाने उपलब्ध करून दिली

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** विधानसभा निवडणुकीच्या काळात प्रचार सभा,कॉर्नर सभा घेण्यासाठी २४ मैदानांची यादी महापालिकेच्यावतीने जाहीर केली आहे.त्यामध्ये मोठ्या जाहीर सभांसाठी १०, तर कॉर्नर सभांसाठी १४ मैदाने उपलब्ध करून दिली आहेत.. अद्याप कोणत्याही पक्षाने एकही



मैदान बुक केले नसल्याची माहिती महापालिकेच्यावतीने देण्यात आली.सोलापूर शहर जिल्ह्यात सध्या विधानसभा निवडणुकीची लगबग चालू आहे. उमेदवारी अर्ज दाखल झाले आहेत. अर्ज माघार घेण्यासाठी चार नोव्हेंबरपर्यंत मुदत आहे. त्यानंतर प्रचाराचा ज्वर चढणार आहे. आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी झडणार आहेत. महापालिका कार्यक्षेत्रात सोलापूर शहर उत्तर, सोलापूर शहर मध्य आणि सोलापूर दक्षिण विधानसभा मतदारसंघातील काही प्रभागांचा समावेश आहे. या मतदारसंघातील मतदारांना आकर्षित करण्यासाठी पक्षाची ध्येयधोरणे त्यांच्यापर्यंत पोहोचवण्यासाठी महाविकास आघाडी आणि महायुतीच्या माध्यमातून अनेक स्टार प्रचारक, सेलिब्रेटी, अभिनेत्यांच्या सभांचे नियोजन केले जात आहे. या सभांसाठी महापालिकेच्या भूमिमालमत्ता विभागाच्या वतीने २४ मैदाने उपलब्ध करून दिली आहेत. मैदान बुक करण्यासाठी भूमिमालमत्ता विभागाच्या वतीने निवडणूक कार्यालयात 'एक खिड़की' योजना सुरू केली आहे.त्याठिकाणी कर्मचाऱ्यांची नियुक्ती केली आहे.मैदानांची मागणी केल्यानंतर रितसर पैसे भरल्यानंतर मैदान बुक केले जाते.

# भाऊ तुमच्या चाळीचा बिटूचा प्रश्न देवेंद्र फडणवीस यांच्या मार्फत आमदार झाल्यावर प्राधान्याने मार्गी- देवेंद्र कोठे

## देवेंद्र दादा तुम्ही आमदार होणारच- दिलीप कोल्हे



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** जुनी लक्ष्मी विष्णू चाळ येथे माझी उपमहापौर दिलीप भाऊ कोल्हे व मंगलाताई कोल्हे यांच्यावतीने दिवाळीच्या अनुषंगाने चाळीतील कामगारांकरिता फराळ व फटाके वाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास व्यासपीठावर शहर मध्यचे महायुतीचे अधिकृत उमेदवार देवेंद्र कोठे, माजी उपमहापौर दिलीप भाऊ कोल्हे शिवसेना महिला आघाडी अध्यक्ष जयश्री ताई पवार उपप्रमुख गवळी ताई, कामगार आघाडी प्रमुख सायबन्ना तेलोळी, भाजपचे सचिव शेखर फंड शिवसेना उपजिल्हाप्रमुख संजय सरवदे, वैद्यकीय अधिकारी बन्ने, शिंदे, शहर प्रमुख मागासवर्गीय माधुरी कांबळे, अर्जुन शिवसिंग वाले, युवा सेना जिल्हा समनव्यक सोशल मीडिया प्रमुख नेहाल शिवसिंगवाले,महिबु सुबानी दर्गा ट्रस्टचे पदाधिकारी अ.रहिमान खान, आबिद जहागीरदार, गुलाम शेख, सलीम पठाण, जुबेर खान, जावेद शेख, आरिफ निगेबान, महिबुब मुजावर, जब्बार कागदी उपस्थित होते.सुरुवातीला भाजपा महायुतीचे उमेदवार देवेंद्र कोठे यांचा माजी उपमहापौर दिलीप भाऊ कोल्हे व मंगला कोल्हे यांच्या शुभहस्ते पुष्पहार घालून सत्कार करण्यात आला. यानंतर मुख्य कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. चाळीतील कामगारांना फराळीचे वाटप आणि देवेंद्र कोठे यांनी चाळीतील कामगार, चिमुकली मुले व शिवसेनेचे प्रमुख पदाधिकारी कार्यकर्ते तसेच यांच्यासमवेत फटाके उडविण्याचा मनमुराद आनंद लुटला.

याप्रसंगी बोलताना महायुतीचे उमेदवार देवेंद्र कोठे म्हणाले जुनी लक्ष्मी विष्णू चाळ येथील मुख्यतः प्रलंबित असलेला बिटूचा प्रश्न मार्गी लावू आपल्या आशीवार्दाने सोलापूरच्या प्रश्नाबाबत विधान भवनात आवाज उठविण्यासाठी एकदा संधी द्या नक्कीच संधीचे सोने करू असे प्रतिपादन केले.

तर माजी उपमहापौर दिलीप भाऊ कोल्हे यांनी त्यांच्या मनोगतात कोठे परिवार आणि आपले जुने वैयक्तिक घरगुती संबंध आहेत. देवेंद्र हे माज्या घरातील प्रमुख सदस्य आहेत त्यामुळे मी माझी जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडणारच आणि देवेंद्र कोठे आमदार नक्की होणारच असे मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन जवाहर जाजू यांनी केले.

या कार्यक्रमास चाळीतील स्थानिक नागरिक जेष्ठ नागरिक युवक, बालगोपाळ यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# पंढरपूर मंगळवेढा विधानसभेची निवडणूक चौरंगी लढत होणार

## चौरंगी लढतीमुळे पंढरपूर मंगळवेढा विधानसभेची निवडणूक चुरशीची होणार



**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** पंढरपूर मंगळवेढा मंगळवेढा मतदारसंघातील विविध पक्षीय उमेदवार निवडणूक रिंगणात उतरले आहेत.

एकूण अठरा जणांनी आपला उमेदवारी अर्ज मागे घेतला असून आता पंढरपूर मंगळवेढा मतदारसंघातील विधानसभा निवडणूक अटीतटीची होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

भाजपाचे उमेदवार समाधान दादा अवताडे तसेच काँग्रस आय चे भगिरथ भालके राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे उमेदवार अनिल सावंत आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे उमेदवार दिलीप बापू धोत्रे अशी चौरंगी लढत पहावयास मिळणार आहे.

पंढरपूर मंगळवेढा मतदारसंघातील या विधानसभेच्या निवडणूकीची आतूरतेने सर्वसामान्य जनता वाट पहात आहे. पाच वर्षातून एकदा येणारी ही निवडणूक मतदारांच्या साठी सर्व बाबतीत आनंदोत्सव साजरा करण्यासारखी असते. कोण किती मते घेणार? कोण कुठे कमी पडणार? कोण कोण सुक्या ओल्या पंगती उठवणार? मतागणिक अर्थ कारणांची चर्चा होत रहाणार.

संविधानाने सर्वसामान्य जनतेला मतदानाचा अधिकार दिला आहे.परंतू ग्रामीण भाग सोडल्यास शहरी भागातून मतदान कमी प्रमाणात होत असते.सर्व सुविधा शहरी भागात प्रथम होत असतात. तरीही शहरी मतदार मतदान करण्यास टाळाटाळ करत असतो.हे नेहमी आपल्या नजरेस पडते. तरी शहरी भागातील मतदारांनी आपले मतदान जरुर करावे.असे आवाहन शासन नेहमीच करत असते.

शहरी भागातील मतदारांपेक्षा ग्रामीण भागातील जनता ही मतदान करण्यास हिरहिरीने जात असतो. शहरी भागातील मतदारांपेक्षा ग्रामीण मतदाराच हुशार आणि सजग म्हणावे लागेल.पहावूया कोण बाजी मारणार ते......

# शहर उत्तर काँग्रेस कार्यकर्त्यांचं आत्मसंमान गहाण ठेवू देणार नाही- सुदीपदादा चाकोते



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):** आगामी विधानसभा निवडणुकीनिमित्त 248 उत्तर विधानसभा सोलापूर मध्ये काँग्रेस च्या प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्त्यांचे तातडीची बैठक यंग ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष सुदीप चाकोते यांच्या नेतृत्वात रविवारी घेण्यात आले. सुदीप चाकोते आपले प्रास्ताविक मध्ये म्हंटले मला उमेदवारी मिळाली नाही किंवा काँग्रेसला उत्तर विधानसभा चे जागा सुटले नाही म्हणून मी नाराज आहे परंतु नाराज होऊन बंडखोरी करणार नाही कारण चाकोते घराणा हा कधीच सत्ता मिळवण्यासाठी काँग्रेस पक्षाच्या विरोधात जाऊन आपले आत्मसन्मान घाण ठेवलेला नाही व पुढे देखील ठेवणार नाही. कार्यकर्त्यांचा माज्यावर प्रचंड दबाव होता अपक्ष भरण्यासाठी परंतु आम्ही सर्वजण या निवडणुकीमध्ये महाविकास आघाडीचा धर्मपालन करू.

248 उत्तर विधानसभा मतदार संघातील काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते आक्रमक मनोगत व्यक्त केले, काही महिन्यांपूर्वी पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीमध्ये शहर उत्तर विधानसभा मतदार संघामध्ये लोकसभा उमेदवार प्रणिती शिंदे यांना निवडून आणण्यासाठी महाविकास आघाडीच्या उमेदवारांनी आपल्या कडून झालेल्या कायाची माहिती आम्हाला द्यावी. शहर उत्तर विधानसभा मधील बहुसंख्य बुथ हे रिकामे होते व काँग्रेसच्या कार्यकर्त्यांना दिलेले बुथ परत घेण्यात आले होते. प्रत्येक वेळी काँग्रेस पक्षानेच महाविकास आघाडीचा धर्म पाळायला हवे का? उत्तर विधानसभा मतदार संघासाठी अधिकृत झालेल्या महाविकास आघाडीच्या उमेदवारांनी आपली उमेदवारी भरताना उत्तर विधानसभा मतदार संघातील काँग्रेसच्या कोणत्याही नेत्यांना, पदाधिकाऱ्यांना व कार्यकर्त्यांना विश्वासात घेतले नाही कार्यकर्त्यांचे म्हणणे होते की, जोपर्यंत महाविकास आघाडीच्या उमेदवारांनी स्वतः होऊन माजी केंद्रीय मंत्री सुशील कुमार शिंदे, खासदार प्रणिती शिंदे व सुदीप चाकोते यांना भेटून कार्यकर्त्यांना जबाबदारी देत नाहीत तोपर्यंत आम्ही उमेदवार साठी काम करणार नाही, अशा आक्रमक शब्दात आपले मनोगत कार्यकर्त्यांनी व्यक्त केले. प्रसंगी सुदीप दादा चाकोते विश्वनाथ अण्णा चाकोते गजानन घोडके, अशोक कलशेट्टी, संजय कुराडे, आनंद खटके, चेतनल , मुकुंद शिंदे, विणाताई देवकते, संघमित्रा चौधरी, भारती ईप्पलपल्ली, सुमन जाधव, हेमलता चिंचोळेकर, ए के क्षीरसागर, नागनाथ कदम, दत्ता आण्णा बंदपट्टे, मल्लिनाथ सोलापूरे, अप्पु शेख, विकी चाकोते. असलम नदाफ, मजा कोथिंबीर, अमीर नाटेकर, बाबरे, आलम नाडेवाले, शुकूर शेख, खंडू माळगे, बसवराज जाबा, सुरज घंटे, अमोल सुर्वे, गोविंद कांबळे,, सुमन जाधव, चंद्रकांत ठणकेदार, अंबादास गुत्तीकोंडा, खाजाबाई जगतार, अभिलाष अचूकटला, मोबीन कल्याणी, शहानवाज कंपली, बापू शिंदे, नागनाथ, प्रकाश नारायणकर, चंद्रकांत टिक्के, सोहेल मंद्रूपकर, सलमान कामतीकर, अशोक कोळी, मुरतोज काझी, लक्ष्मीकांत वन्नम, सिद्राम मंजेली, साई जाधव, लक्ष्मण मंजेली, प्रवीण बत्तुल, अजय मुदगल, निलेश गुंजाळ, बाबू धोत्रे, मोहसीन पिरजादे, आकाश भोसले, संतोष इरकल, सोमनाथ यमपुरे, अशोक यमपुरे, राजू कुक्करी, भुजंग जाधव, विकी धोत्रे, अनिल विटकर, धीरज बंदपट्टे, शुभम धोत्रे, अमर मंजुळकर, राहुल धोत्रे,अजय जाधव,साई जाधव, गणेश मंठाळकर, नागेश मंठाळकर, शंकर चौगुले, सागर विटकर, राजू शिंदे. विनायक यमगल्ली, सुनील व्हटकर, शुकुर शेख उत्तर विधानसभा काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते संख्येने उपस्थित होते.

# प्रशांत परिचारक यांच्या हस्ते महायुतीचे उमेदवार समाधान आवताडे यांच्या प्रचाराचा शुभारंभ



**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** महायुतीचे भाजपाचे उमेदवार समाधान आवताडे यांच्या प्रचाराचा शुभारंभ माचणुर येथील श्री सिद्धेश्वर मंदिर येथे प्रशांत परिचारक यांच्या हस्ते श्रीफळ अर्पण करून करण्यात आले.

यावेळी सभेस संबोधिताना महायुतीचे भाजपा, शिवसेना (शिंदे गट), राष्ट्रवादी (अजित पवार गट) यांनी आर.पी.आय,(अ), रयत क्रांती व मित्र परिवार व घटक पक्षांचे नेत्यांनी विद्यमान आमदार समाधान आवताडे यांना भरघोस मतांनी विजयी करण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले.तर जिल्ह्याचे नेते प्रशांत परिचारक यांनी पंढरपूर तालुक्याची चिंता करण्याची गरज नाही असे सांगून त्यांनी आमदार समाधान आवताडे यांना आश्वाशीत केले तर समाधान आवताडे यांनी मागील निवडणुकीत परिचारक यांच्या आशीवार्दाने विजयी झालो होतो असे सांगून त्यांनी यावेळी सुध्दा त्यांनी मला संपुर्ण सहकार्य करणार आहेत त्यामुळे माझा विजय निश्चित आहे.असे ते म्हणाले

याप्रसंगी महायुतीचे घटक पक्ष असलेल्या तसेच भाजप व मित्र पक्षांचे कार्यकर्ते, व नेते मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते

# राजाभाऊ खरे यांनी मनोज जरांगे पाटील यांची घेतली भेट



**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** मोहोळ विधानसभा मतदारसंघातील राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार राजाभाऊ खरे व उमेश पाटील यांनी आपल्या सहकारी,समर्थक पदाधिकाऱ्यांसमवेत बुधवारी अंतरवाली सराटी येथे जाऊन मराठा आरक्षण योद्धा मनोज जरागे पाटील यांची भेट घेतली.राज्यभरात मराठा आरक्षणासाठी आंदोलन सुरू असताना सुरुवातीपासूनच उद्योजक राजाभाऊ खरे यांनी मराठा आरक्षणासाठी आग्रही होती.मराठा भूमिका घेतली गरजवंत समाजाला आरक्षण मिळाले पाहिजे ही भूमिकाही त्यांनी वेळोवेळी मांडली आहे. मोहोळ विधानसभा मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून खरे यांना अधिकृत उमेदवारी मिळाली. त्यानंतर बुधवारी लखन माने,अजार्ची छाननी नाईकनवरे,बाळासाहेब बालाजी उमेदवारी असतानाही खरे आणि उमेश माळी, सौदागर गायकवाड पाटील यांनी थेट अंतरवाली हे पदाधिकारी उपस्थित होते. सराटी येथे जाऊन जरांगे यांची सुमारे अर्धा तास मोहोळ भेट घेतली. यावेळी त्यांच्यासमवेत मतदारसंघातील या पदाधिकाऱ्यांनी विजयराज डोंगरे, मानाजी माने, जरांगे यांच्याशी संवाद साधला. बाळासाहेब गायकवाड, सत्यवान भेटीविषयी बोलताना खरे देशमुख, शिवरत्न गायकवाड, म्हणाले, सर्वसामान्य, गोरगरीब,विकी देशमुख, सौदागर खडके,शोषित घटकांसाठी वंचित,करीत आपण तन-मन-धनाने आणि प्रामाणिकपणाने काम आहोत. मोहोळ मतदारसंघात आपण सर्व सहकाऱ्यांना सोबत घेऊन परिवर्तनाचा हा लढा उभारलेला आहे. मराठा आणि सर्व अठरापगड जातींना सोबत घेऊन काम करण्याची आपली भूमिका आहे. हीच भूमिका आपण जरांगे यांच्यापुढेही मांडली आहे.